आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१४ एप्रिल २०२४ - रविवार

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नागपुरात दीक्षाभूमी इथं केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी बाबासाहेबांचा अस्थिकलशाचं दर्शन घेत त्यांना आदरांजली वाहिली.

यावेळी त्यांच्याबरोबर भाजप प्रदेशाध्यक्ष चन्द्रशेखर बावनकुळे, सुलेखा कुंभारे होत्या.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दीक्षाभूमीला भेट देऊन **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना** अभिवादन केलं. बाबासाहेबांनी कायमच स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा पुरस्कार केला, ते समाजसुधारणेचे अग्रणी होते अशा शब्दांत त्यांनी **बाबासाहेबांना** आदरांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. बाबासाहेबांनी समाजानं दूर सारलेल्या घटकांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्यात स्वाभिमान जागृत केला असं पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र आंबेडकर जयंती साजरी केली जात आहे. विविध सरकारी, निमसरकारी कार्यालयं, विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये बाबासाहेबांना आदरांजली वाहण्यात आली.

**नाशिक इथं** रात्री १२ वाजता शालीमार आणि नाशिकरोड इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. सीबीएस इथं लंडन हाऊसची प्रतिकृती साकारली आहे.

**नांदेडच्या** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातही आंबेडकर जयंती साजरी झाली. भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दलातर्फे बाबासहेबांना मानवंदना देण्यात आली.

**सोलापूर** शहरातल्या आंबेडकर चौकात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्थांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली.

**अकोल्यात** अशोक वाटिका इथं बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला प्रकाश आंबेडकर यांनी पुष्पहार वाहून अभिवादन केलं.

**परभणी**, **धाराशिव, रत्नागिरी** इथं त्या त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली** इथं आज केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<><><><><><>**

गरीब, शेतकरी, युवा आणि महिला या चार घटकांना केंद्रस्थानी ठेवून सब का साथ सब का विकास या तत्त्वाच्या आधारे विविध योजनांची आश्वासनं देणारा भाजपाचा निवडणूक जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या जाहीरनाम्याचं लोकार्पण केलं. पक्षाध्यक्ष जगतप्रकाश नड्‌डा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, आणि इतर ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते. गरिबांना शिधापत्रिकेवर मोफत अन्नधान्य देण्याची योजना पुढची पाच वर्षं चालू ठेवण्याचा, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३ कोटी घरं बांधण्याचा, तसंच ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक नागरिकापर्यंत आयुष्मान भारत योजना पोहोचवण्याचा संकल्प या जाहीरनाम्यात व्यक्त केला आहे. एक देश

एक निवडणूक, एकसामायिक मतदारसंघ, आणि पेपरफुटीविरोधी कायदा करण्याचं आश्वासन भाजपाने या संकल्पपत्रात दिलं आहे.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज जाहीर केलेला जाहीरनामा म्हणजे खोट्या आश्वासनांचं गाठोडं असल्याची टीका काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसच्या नेत्या आणि प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना भाजपाच्या जाहिरनाम्यावर प्रतिक्रिया दिली.

<><><><><><>

आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या आणि परवा म्हणजेच १५ आणि १६ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ३ ऐवजी संध्याकाळी ४ वाजता प्रसारीत केलं जाणार आहे.

<><><><><><>

मराठा समाजाला लवकरात लवकर ओबीसी कोट्यातून आरक्षण नाही दिलं तर येत्या पाच जूनपासून पुन्हा बेमुदत उपोषण सुरू करायचा इशारा मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मराठा समाजही विधानसभा निवडणुकीची तयारी करेल, असंही पाटील यांनी सांगितलं. ते आज मुंबईत चैत्यभूमीवर वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><><>

आज राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिन पाळला जात आहे. १४ एप्रिल १९४४ ला मुंबई बंदरात दारुगोळ्याचा साठा असलेल्या बोटीला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविताना मुंबई अग्निशमन दलाचे ६६ अधिकारी आणि जवान शहीद झाले होते. या घटनेच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. यानिमीत्त आज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दल मुख्यालयात झालेल्या

कार्यक्रमात वीर स्मृती स्तंभाला पुष्पचक्र अर्पण सर्व शहिदांना आदरांजली वाहिली गेली, तसंच २० एप्रिल पर्यंत चालणाऱ्या अग्निशमन सेवा सप्ताहाचाही प्रारंभ केला गेला. अग्निशमन दलाचे आजी माजी अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><><>

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओ आणि भारतीय लष्करानं, रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी घेतली. राजस्थानमधे पोखरण इथे काल ही चाचणी झाली. या क्षेपणास्त्रांच्या यशस्वी चाचणीबद्दल संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ आणि भारतीय लष्कराची प्रशंसा केली आहे.

<><><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत, आज दुपारी साडेतीन वाजता, कोलकत्ता नाईट रायडर्स आणि लखनऊ सुपर जाएंट्स यांच्यातला सामना कोलकात्यात होणार आहे.

तर संध्याकाळी साडेसात वाजता मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यातला सामना वानखेडे स्टेडीयमवर होणार आहे.

<><><><><><>

अभिनेता सलमान खान याच्या वांद्रे इथल्या निवासस्थानाबाहेर आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमाराला गोळीबार झाल्याचं वृत्त आहे. सलमान खान याला अनेकदा धमकी मिळाल्या असल्यानं, मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेनं तात्काळ या घटनेचा तपास सुरु केला आहे. मात्र या प्रकरणात अद्याप कोणालाही ताब्यात घेतलं नसल्याचं गुन्हे शाखेनं कळवलं आहे.

<><><><><><>

सांगली जिल्ह्यात कवठेमहांकाळ तालुक्यातल्या आरेवाडी इथं बिरोबा देवाच्या यात्रेला आजपासून उत्साहात सुरुवात झाली. ही यात्रा पाच दिवस चालणार आहे. यात्रेसाठी स्वयंसेवक तसंच पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

//<><><><><><>//